महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन मुंबई.

क्रमांक ३८६० / माहिती अधिकार (समन्वय) कक्ष,

दिनांक : ३ मार्च, २०२२

संदर्भ : (१) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक केंमाअ-२००५/प्र.क्र. ४३०/०५/५, दि. २० जानेवारी, २००६
(२) क-१ (आस्थापना) कक्षाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ४१२०६/क-१, दि. १० ऑगस्ट, २००६

:: प रि प त्र क ::

माहितीचा अधिकार, २००५ मधील कलम २५ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षाच्या माहे जानेवारी महिन्यात राज्य माहिती आयोगास सादर करण्यात येतो. तद्नंतर राज्य माहिती आयोगाचा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात आयोगाद्वारे सादर करण्यात येतो. उक्त अहवाल सादर झाल्यानंतर या सचिवालयातील कक्षांकडून प्राप्त झालेल्या माहितीचा एकत्रित गोषवारा महाराष्ट्र विधानमंडळाच्या संकेतस्थळावर माहितीस्तव समाविष्ट करण्यात येतो.

यानुषंगाने असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, मागील कालावधीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विविध कक्षांकडून माहितीचे विवरणपत्र माहिती अधिकार (समन्वय) कक्षास पाठविण्यास विलंब झालेला आहे. विविध कक्षांना वारंवार दूरध्वनीवरून माहितीचे विवरणपत्र पाठविण्याची विनंती करूनही माहिती वेळेत प्राप्त होत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगास या सचिवालयाचे माहितीचे विवरणपत्र पाठविण्यास विलंब होतो.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्षांना प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत माहितीचे विवरणपत्र समन्वय कक्षास सादर करण्यास कळविण्यात आले असून सर्व संबंधित कक्षांकडून माहितीचे विवरणपत्र प्राप्त झाल्यानंतर विधानमंडळ सचिवालयाच्या माहिती अर्जांचा एकत्रित गोषवारा दर्शविणारे विवरणपत्र समन्वय कक्षाद्वारे राज्य माहिती आयोगास पाठविण्याची कार्यपध्दती प्रस्थापित आहे.

२../

या सर्व कक्षांपैकी एका कक्षाकडूनही माहितीचे विवरणपत्र विहित कालावधीत समन्वय कक्षास प्राप्त व्हावयाचे राहिल्यास राज्य माहिती आयोगास माहितीचा एकत्रित गोषवारा दर्शविणारे विवरणपत्र पाठविणे प्रलंबित राहते.

वास्तविक पहाता माहिती अधिकारात विविध कक्षांकडे प्राप्त होणा-या अर्जांवरील कार्यवाहीचे विवरण माहिती अधिकार कायद्यानुसार समन्वय कक्षास नियमितपणे व विहित कालावधीत आयोगास पाठविण्यास तातडीने उपलब्ध करून देणे ही प्रत्येक कक्षाची अधिनियमानुसार असलेली जबाबदारी व उत्तरदायित्व आहे व त्याचे कसोशीने पालन करणे हे त्या त्या कक्षातील संबंधितांचे बंधनकारक कर्तव्य आहे. विवरणपत्र प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत न चुकता समन्वय कक्षास उपलब्ध करून देण्याची दक्षता त्या त्या कक्षातील संबंधितांनी घ्यावी.

याप्रमाणे माहितीची विवरणपत्र विहित कालावधीत माहिती अधिकार (समन्वय) कक्षास उपलब्ध करून द्यावयाची कार्यवाही काटेकोरपणे पार पाडण्यास विलंब, टाळाटाळ वा कुचराई **करण्यात आल्यास** संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांचेविरुध्द **उचित** कार्यवाही **प्रस्तावित** करण्यात येईल.

(राजेन्द्र भागवत)
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) या सचिवालयातील सर्व अधिकारी.
(२) या सचिवालयातील सर्व कक्ष.